# <u>नियमीत दिवाणी दावा क्र. २६/२०१८ मधील</u>

## <u>नि.३३ वरील आदेश</u>

## <u>सीएनआर–एमएचएसएन–१२–०००२१५–२०१८</u>

(धनाजी जाधव वि. मोहन जाधव वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादींविरुद्ध वकिलांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक व्हावी यासाठी केला आहे.

२. वादीने कथन केले आहे की, प्रतिवादींनी कैफियतीमध्ये असे म्हटले आहे की तहसिलदार यांनी रस्ता केस क्र. ११/५ चा निकाल दि. १३/०९/२०२० रोजी अंलमबजावणी होवून रस्ता झालेला आहे. तसेच तो रस्ता पूर्वीपासून आजअखेर वहिवाटीत आहे परंतु वास्तविकपणे तहसिलदारांच्या आदेशाने गट नं. १८५/१३२ व १३६ या गटाच्या दक्षिण बाजूने रस्ता झालेला नव्हता व नाही. तसेच वादीच्या जमिनीच्या दक्षिण बाजूस जमीन जिथे संपते तिथे गट नं. १८५ व ३६ या गटामध्ये पाण्याचे चेंबर असून त्या चेंबरने वादी त्यांचे जमीनीस पाणी पाजतात. तसेच दावा मिळकतीची वस्तुस्थिती व परिस्थीती प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार आहे का नाही व वादीच्या म्हणण्यानुसार पाण्याचे चेंबर व पाण्याचे पाट आहेत का नाही ही वस्तुस्थिती न्यायालयापुढे येणे आवश्यक असलेने, सदरकामी वकिलांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणेत यावी.

३. प्रतिवादींनी सदरकामी त्याचे म्हणणे देवून अर्ज नांमजुर करणेचे विनंती केली. तसेच दावा प्रलंबित करण्याच्या हेतूने वादीने जाणीवपूर्वक अर्ज दिला आहे असे कथन केले.

४. वादीच्या वकिलांना व वादींना वारंवार पुकारले असता गैरहजर. अनेकवेळा युक्तीवादीची संधी वादीस दिली, परंतु त्यांनी युक्तीवाद केला नाही. त्यामुळे अर्ज वादीच्या युक्तीवादाविना गुणदोषावर ठरविण्यात येत आहे.

५. प्रतिवादींच्या विधीज्ञांनी तीव्र आक्षेप घेतला की अर्ज मंजुर करता येणार नाही. कारण अर्ज पुरावा गोळा करण्याच्या उद्देशाने सादर केला आहे. जर अर्ज मंजुर केल्यास collection of evidence होईल. त्यामुळे अर्ज नामंजुर करणेत यावा असा युक्तीवाद केला.

६. एकंदरित दाव्यातील कथने व अर्जातील मागणीचा विचार करता अर्ज मंजुर करणे न्यायोचित होणार नाही. कारण दि.प्र.सं. आदेश २६ नियम ६ नुसार देखील अर्ज मंजुर करता येणार नाही. कारण अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास पुरावा गोळा करण्याच्या हेतूने वादीने दिला आहे असे दिसून येत असलेने अर्ज फेटाळणेस पात्र आहे. त्यामुळे फेटाळणेस पात्र ठरत असलेने. मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Nishant Dipak Rudrabhate
Date: 2021.02.12 17:25:54 +05'30'

**पलुस.** **(नि.दि. रुद्रभटे )**

**दिनांक–१२/०२/२०२१** **सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर पलूस**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Pravin G. Sabale |
| Court | : | Jt. CJ.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 12/02/2021 |
| Signed by the Presiding Officer on | : | 12/02/2021 |
| Uploaded on | : | 12/02/2021 |